आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, २६ जुलै २०२२ । वर्ष : ४ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ३६ । पाने : ४ । मूल्य २ ₹

एडिटर डेस्क

## आर.के.नावाचा समाजसेवक



माजलगावच्या सामाजिक पटलावर समाजसेवक तथा उद्योजक रियाज काझी यांचे नाव अल्पावधीत अग्रक्रमाने घेतले जात आहे. त्याला कारणही तसेच आहे. रियाज काझी हा समाजसेवक उद्योग क्षेत्रात आपले पाय रोवत असताना समाजिक बांधीलकीच्या भावनेतूनही कार्यरत असतो. विशेष मुलाखतीत बोलताना रियाज काझी म्हणाले, राष्ट्रीय एकात्मतेशिवाय पर्याय नाही हा संदेश समाजातील तळागाळापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. सर्व भारतीय गुण्यागोविंदाने नांदल्यास भारत महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास काझी यांनी व्यक्त केला. मराठा क्रांती मोर्चाच्या काळात आपण वाहन दुरूस्ती पथक स्थापन करून मोर्चेकरांची वाहने मोफत दुरूस्त करून दिली. त्यानंतर औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय इज्तेमासाठी तेथील हिंदू बांधवांनी असेच वाहन दुरूस्ती पथक स्थापन करून सहकार्य केले. सामाजिक क्षेत्रात कसे उतरलात यावर बोलताना काझी म्हणाले, माझे चुलते जमिल काझी हे माझ्यासाठी आदर्शवत असून त्यांच्या प्रेरणेतुनच हा सामाजिक कार्याचा वसा पुढे चालवित आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सगळेच व्यवहार ठप्प असल्याने गोरगरिबांचे हाल होत आहेत. अशा काळात गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणे गरजेचे आहे. रमजानच्या काळात अनेक गोरगरिबांना हिंदू बांधवांनी शिरखुर्मा आणि इतर पदार्थ बनविण्यासाठी साहित्य माझ्याकडे सुपूर्त केले आणि ते माझ्या टीमने घरोघरी पोहच केले. कोरोना लढ्यातही रियाज काझी हे शांत बसले नाहीत. पायाला भिंगरी बांधल्यागत गोरगरिबांच्या मदतीला धावून केले. व्यवसायातून तयार झालेल्या मित्रांना एकत्र करून गरजूंना तब्बल पंधराशेपेक्षा अधिक किराणा किटस् वाटप केले आहेत. या कार्याची दखल म्हणून माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने त्यांना कोरोना योध्दा पुरस्काराने सन्मानित केले आहे. उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात तरूणांना संधी देणारे रियाज काझी यांची धडपड सुरू असते. नवशोधण्याची तयारी असते. दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन समाजात सकारात्मक विचार पेरण्याचे कार्य काझी करत आहेत. त्यांच्या या सर्व कामाची व्याप्ती मोठी आहे. नवतरूणांना स्वप्नांच्या दिशेने मार्गस्थ करणाऱ्या या समाजसेवकाच्या कामाची दखल घेणे गरजेचे आहे.

■ बाबा श्रीहरी देशमाने

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# तुमच्या बजेटमध्ये गाडी हवी?

# आर.के.मोटर्स नवा पर्याय

ग्राहकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आर.के.मोटर्स द्वितीय वर्षात पदार्पण करत आहे. माजलगाव शहर, परिसर, तालुका आणि शेजारिल परभणी, जालना जिल्ह्यातील ग्राहकही आर.के.मोटर्सकडे आकर्षित होत आहेत. आपल्या बजेटमध्ये आपल्या स्वप्नातील वाहन खरेदी करण्याची नामी संधी आ.के.मोटर्सने ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. माजलगाव शहरात मुख्यालय असलेल्या आर.के.मोटर्सचे मुंबईतही कार्यालय उभारले आहे. व्यापक



कव्हरस्टोरी
**भगीरथ तोडकरी**

जनसंपर्काच्या जोरावर आज आर.के.मोटर्स वाहन उद्योग क्षेत्रात पुढे जात आहे. दर्जेदार गाड्यांची विक्री ग्राहकांना करून देण्यासाठी आर.के.मोटर्सची टीम सदैव तत्पर असते. ग्राहकांचे प्रश्न, त्यांचे बजेट या दोहोंचा ताळमेळ लावून ग्राहकांना हवं ते वाहन तत्परतेने देण्यासाठी आम्ही उत्सुकच असतो. चालकाला मालक करण्याच्या प्रक्रियेत आर.के.मोटर्स इतरांपेक्षा एक पाऊल पुढे टाकत आहे. ग्राहकांचा अल्पावधीत विश्वास संपादन करणे मोठे दिव्य असते. ते ग्राहकांच्या पसंतीमुळे लिलया पार पाडले आहे. जवळपास वर्षात दिडशेच्या वर वाहने विक्री करून आम्हीच नवा विक्रम केला आहे, अशी माहितीही शेख ताहेर यांनी दिली.

वाहन क्षेत्रात तग धरणे प्रचंड संघर्षमय असते. हा संघर्ष कमी करण्याचे काम आर.के.ग्रुप ऑफ कंपनीचे सर्वेसर्वा रियाज काझी यांच्या भक्कम पाठबळामुळे झाले. 'आर.के.' हा ब्रॅण्ड विकसित करण्यावर आमचा भर असतो. वाहन धारकांना आर.टी.ओ. कार्यालय संदर्भातील येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. यासाठी स्वतंत्र यंत्रणा राबविली जाते आणि ग्राहकांचे हीत जपले जाते. वाहन उद्योग क्षेत्रात उतरण्यासाठी समाजसेवक तथा उद्योजक रियाज काझी यांना संकल्पना सांगितल्यावर त्यांना मोठे पाठबळ देऊन आर.के.मोटर्सचे विश्व साकारले. अर्थात या मागे माझ्या टीमची प्रचंड मेहनत आहे. अतिशय सचोटीने हा व्यवहार पार पाडण्याची तयारी आमची असते, अशीही माहिती शेख ताहेर यांनी दिली. आर.के.मोटर्समध्ये फोर व्हिलर बरोबरच टु व्हिलर विक्रीचीही सुविधा आहे. वर्षभरात पन्नास दुचाकींची विक्री झाली आहे. यात बुलेटला ग्राहकांनी सर्वाधिक पसंती दिली.

**वाहन उद्योग क्षेत्रात आर.के.मोटर्सने केवळ एक वर्षापूर्वी या क्षेत्रात पाऊल ठेवले. अगदी अल्पावधीत ग्राहकांच्या मनात विश्वास संपादन केला आहे. माजलगावच्या वाहन उद्योग क्षेत्रात आपल्या बजेटमध्ये वाहन मिळत असल्याने वर्षभरातच शेकडो वाहनांची विक्री झाली असल्याची माहिती आर.के.मोटर्सचे संचालक शेख ताहेर शेख बशीर यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.**




### आर.के.ग्रुपची एक्टिव टीम

आर.के.मोटर्सच्या प्रगतीशील वाटचालीस त्यांच्या टीमचे मोठे योगदान आहे. प्रत्येकाच्या संकल्पना अंमलात आणल्या जात आहेत. या टीममध्ये शेख ताहेर शेख बशीर, बाळासाहेब अंबुरे, रईसोद्दीन काझी (रियाज काझी यांचे वडील) गणेश अंबुरे, अफजल सय्यद, शेख अबुझर शेख ताहेर, शेख अमन, शेख शादाब समावेश आहे. तसेच आर.के.मोबाईल शॉपीमध्ये अस्लम खान, जुबेर खान, शेख शोएब, दिग्विजय सोळंके आदींची टीम तत्पर आहे. आर.के.स्टॅण्डर्ड इन्स्टिट्युटमध्ये शेख तौफिक, सुरज सावंत, शेख हकिम आदी सहकारी आहेत.

### चालक ते संचालक



आर.के.मोटर्सचे संचालक शेख ताहेर मूळ गाडीचे वाहक म्हणून काम करत होते. वाहन क्षेत्रातील शेख ताहेर यांचा अतिशय संघर्षमय प्रवास आहे. त्यांच्या वाहन क्षेत्रातील दीर्घ अनुभवाचा फायदा आर.के.मोटर्सला होत आहे. रियाज काझी यांचे वेळोवेळी मिळत असलेले मार्गदर्शन आणि पाठबळामुळे आर.के.मोटर्सचा आलेख प्रगतीकडे जात आहे, अशाही प्रतिक्रिया ग्राहकांनी दिल्या. आर.के.मोटर्सचा आगामी काळात राज्यभर विस्तार करण्याचा मानस रियाज काझी आणि शेख ताहेर यांनी व्यक्त केला.

### ग्राहकांची काळजी घेणारे आर.के.मोटर्स

जालना जिल्ह्यातील नागोबाचीवाडी (ता.घनसावंगी) येथील अशोक महादेव कोकणे म्हणाले, आर.के.मोटर्स मधून आम्ही नुकतीच स्विफ्ट डिझायर गाडी खरेदी केली आहे. आम्हाला आमच्या बजेटमध्ये गाडी मिळाली. आर.के.मोटर्सने अतिशय आत्मियतेने ग्राहकांची काळजी घेतली. त्यामुळेच अल्पावधीत आर.के.मोटर्स नावरूपास आले.

### ग्राहकांसाठी स्वतंत्र कौन्सिलिंग सेंटर

माजलगाव शहरातील तेलगाव रोडवर सिंदफणा नदीच्या पुलाजवळ आर.के.मोटर्सचे प्रशस्त जागेत शोरूम आहे. मराठवाड्यातील जालना, परभणी आणि अहमदनगर जिल्ह्यातील ग्राहकही या शोरूमशी जोडले गेले आहेत. स्वतंत्र कौन्सिलिंग सेंटर उभारून येणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या वाहन विषयक शंका निरसन करण्याचे काम आर.के.मोटर्स करत आहे. भविष्यात महाराष्ट्रभर नेटवर्क उभारण्याचा मानस आर.के.मोटर्सचा आहे. ग्राहकांनी वाहन विषयक माहिती जाणून घेण्यासाठी किंवा आर.के.मोटर्सला भेट देण्यासाठी ७७४१८४३४४४, ९२२५८७०९८७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





# कोशिश करने वालों की हार नहीं होती!

## आर.के.ग्रुपचे सर्वेसर्वा रियाज काझी यांचा ठाम विश्वास



'लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करने वालों की हार नहीं होती, कुछ किये बिना किसी की जयजयकार नहीं होती' या ओळीप्रमाणे ज्यांना ध्येय आहे. अशीच माणसे यशस्वी होतात, असे मत आर.के.ग्रुप ऑफ कंपनीचे सर्वेसर्वा रियाज काझी यांनी 'वर्तमान'शी बोलताना मांडले. मोबाईल दुरूस्ती केंद्रापासून सुरू झालेला आर.के.ग्रुपचा प्रवास आर.के.मोटर्सकडे वळला आहे. मोबाईल दुरूस्ती क्षेत्रात माजलगाव शहर आणि तालुक्यात आर.के.ग्रुपने वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मूळ मोबाईल दुरूस्ती केंद्र स्थापन करून आर.के.ग्रुप नावरूपास आणला. आता आर.के. मोटर्सच्या माध्यमातून वाहन खरेदी–विक्री क्षेत्रात पाऊल टाकले आहे. आर.के.स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्रात एका बॅचला किमान दहा



विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. त्यासाठी अनुभवी तज्ज्ञांची टीम नियुक्त केलेली आहे. फास्टट्रॅक कोर्स एका महिन्याच्या कालावधीसाठी तर प्रायमरी पासूनचा कोर्स तीन महिने कालावधीचा आहे. नव्वद टक्के

**वर्तमान स्पेशल**

प्रॅक्टिकल वर आधारित कोर्स उपलब्ध असून जीवनात स्वावलंबी होणाऱ्या युवकांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे संचालक रियाज काझी यांनी सांगितले. या प्रशिक्षण केंद्रात प्रत्येक प्रशिक्षणार्थीला सूक्ष्मदर्शक, टच रिपेअर मशीन, डी.एस.ओ. मशीन, डिस्प्ले रिपेअर मशीन आणि एल.सी.डी.मार्फत मार्गदर्शन केले जाते. या प्रशिक्षण केंद्राचे गेल्या २४ ऑक्टोबर रोजी उद्घाटन झाले. त्यानंतर मोठा प्रतिसाद मिळत आहे. आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्रामार्फत अनेक युवक प्रशिक्षित होवून आपला स्वतंत्र व्यवसाय उभा करावा यासाठी माझी सर्व धडपड सुरू आहे, अशी माहिती रियाज काझी यांनी दिली. एवढे हायटेक मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण केंद्र माजलगावसारख्या ग्रामीण भागात सुरू केले आहे. त्याचा लाभ सर्वार्थाने ग्रामीण युवकांनी घेण्याची गरज असल्याचे आवाहन काझी यांनी केले आहे. सुसज्ज आणि अत्याधुनिक यंत्रणा उभी करून माजलगावात सुरू झालेले हे प्रशिक्षण केंद्र मराठवाड्यातील पहिले असल्याचा दावाही इन्स्टिटयूटच्या वतीने करण्यात आला आहे.

माजलगावात आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्र सुरू करून तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी संचालक रियाज काझी यांची धडपड सुरू आहे. युवकांना व्यवसायात उभे करण्यासाठी हे ट्रेनिंग सेंटर निर्णायक भूमिका बजावत आहेत. ट्रेनिंग सेंटरमधील विविध कोर्स बाबत अधिक माहिती घेण्यासाठी माजलगावस्थित ठक्कर बाजार, जुने बसस्थानक परिसर येथे भेट द्यावी, असे आवाहन इन्स्टिट्यूटतर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, मोबाईल दुरूस्ती केंद्रापासून सुरू झालेला प्रवास वाहन उद्योगाकडे सुरू आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कल्पकते बरोबरच कठोर परिश्रमाची गरज लागते. त्यासाठी आर.के.ग्रुप नेहमी तत्पर असतो.



### रियाज काझी प्रेरणादायी व्यक्तीमत्व : राहूल बोरगे

आर.के. ग्रुपचे संचालक रियाज काझी जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. त्यांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर माझ्यासारखे अनेक तरूण तयार झाले आहेत. एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व म्हणून मी रियाज काझी यांना पाहतो. त्यांच्या मार्गदर्शनाचा केवळ व्यवसायच नाही तर जीवनासाठीही उपयोग होत आहे, अशी प्रतिक्रिया आर.के.स्टॅण्डर्ड मधून मोबाईल दुरूस्तीचे प्रशिक्षण घेतलेल्या राहुल बोरगे या युवकाने दिली.

## संपादकीय

# चुकत असलेले हवामान अंदाज

आजकाल हवामनाचे अंदाज चुकत आहेत. याबाबत अभ्यासपूर्ण अंदाज वर्तविण्याची गरज आहे. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न केले जात असूनही आपण याबाबत आवश्यक तेवढे सावध नसल्याचं पर्यावरणवाद्यांचं मत आहे. पर्यावरणाबाबतीतही जग दोन भागांमध्ये विभागलं गेलं आहे. एका बाजूला विकसितम तर दुसऱ्या बाजूला विकसनशील देश आहेत. या दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. मात्र पर्यावरणरक्षण साधायचं, तर जगाला एकत्रितपणे काम करावं लागेल. आज जगापुढे अनेक पर्यावरणविषयक प्रश्नांची मालिका उभी ठाकली आहे. विविध माध्यमांमधून जनजागृती आणि तातडीच्या उपाययोजना सुरू झाल्यानंतर यावर काही प्रमाणात का होईना, तोडगा काढण्यास सुरुवात झाली असली तरी अद्याप या प्रयत्नांना योग्य दिशाही सापडलेली नाही, असं आपण म्हणू शकतो. याचाच एक भाग म्हणजे जगात वायू प्रदूषणाचा कहर थांबण्याचं नाव घेताना दिसत नाही. अमेरिकेतल्या शिकागो विद्यापीठाने वार्षिक वायू गुणवत्ता जीवन निर्देशांकात म्हटलं आहे की, प्रदूषित हवेमुळे भारतातल्या लोकांचं आयुष्य सरासरी पाच वर्षांनी कमी होत आहे, तर जगात हा आकडा २.२ वर्ष इतका आहे. बांगलादेशनंतर भारत हा जगातला सर्वाधिक प्रदूषित देश आहे. भारताची १३५ कोटी लोकसंख्या रोगट हवेत श्वास घेत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. ६३ टक्के लोक अत्यंत धोकादायक वायू प्रदूषणाचे बळी ठरत असल्याचंही हा अहवाल सांगतो. भारतातली हवा जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेल्या पातळीपेक्षा खूपच खालच्या पातळीवर आहे. सदर अहवालानुसार, भारतात हवेचा दर्जा इतकाच निकृष्ट राहिला, तर उत्तर भारतातल्या लोकांचं वय ७.६ वर्षांनी कमी होऊ शकतं. आधीच बराच काळ प्रदूषित हवेच्या संपर्कात राहिल्यामुळे दिल्लीतल्या लोकांचं आयुष्य सरासरी दहा वर्षांनी कमी झालं आहे. या निर्देशांकानुसार दिल्ली हे जगातलं सर्वात प्रदूषित शहर आहे. याच कारणामुळे आगामी काळात लखनऊमधल्या लोकसंख्येचं सरासरी वयोमान ९.५ वर्षांनी कमी होईल. याशिवाय बिहार, चंदिगड, हरियाणा, पंजाब आणि पश्चिम बंगालमध्येही स्थिती फारशी चांगली नाही. भारतातली हवा अशीच खराब राहिली, तर इथल्या ५१ कोटी लोकांचं आयुष्य ७.६ वर्षांनी कमी होण्याचा धोका तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. या अहवालानुसार २०१३ पासून जगातल्या वाढत्या प्रदूषणात भारताचा सर्वात मोठा सहभाग आहे. देशात ४४ टक्के प्रदूषण वाढलं आहे. संशोधकांच्या मते, प्रदूषणात २५ टक्के घट झाली तरी भारतीयांच्या सरासरी वयात १.४ वर्षांची भर पडेल. १९९८ पासून जगातल्या वायू प्रदूषणात वार्षिक ६१.४ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे सरासरी आयुर्मान २.१ वर्षांनी कमी झालं आहे. एअर क्वालिटी लाइफ इंडेक्स' नुसार भारताची राजधानी दिल्ली हे जगातलं सर्वात प्रदूषित शहर आहे. हवेतील पार्टिक्युलेट मॅटर' (पीएम) हा घटक मानवी फुप्फुसासाठी कोणत्याही जीवघेण्या विषापेक्षा कमी नाही. या अहवालात पीएम २.५चा तपास करण्यात आला आहे. हे हवेत असणारे कण २.५ मायक्रोमीटर किंवा त्याहून कमी आकाराचे असतात. त्यांच्या वाढत्या प्रभावानं नागरिकांचे अकाली मृत्यूही होऊ शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, हवेतील पीएम २.५ हे ५ मायक्रो ग्रॅम प्रति घनमीटरपेक्षा जास्त नसावं; परंतु संपूर्ण देशात या कणांचं प्रमाण यापेक्षा जास्त आहे. वायू प्रदूषणाबरोबरच भारतात कुपोषणामुळे सरासरी आयुर्मान १.८ वर्षांनी आणि धूम्रपानामुळे दीड वर्षांनी कमी झाल्याचं अहवालात म्हटलं आहे. आधीच जगातल्या निम्म्याहून अधिक लोकसंख्येला धोकादायक अशा हवामानाच्या परिणामांचा सामना करावा लागत आहे. संयुक्त राष्ट्र हवामान विज्ञान पॅनेल'ने आपल्या एका प्रमुख अहवालात इशारा दिला आहे की, हवामान बदल अत्यंत वेगानं होत असून ते झेलण्यासाठी मानव पूर्णपणे तयार नाही. अहवालात म्हटलं आहे की, हवामान बदलामुळे २०४० पर्यंत संपूर्ण जगच भुकेले, आजारी, अधिक धोकादायक स्थितीत जाणं आणि गरीब बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०५० पर्यंत समुद्राची पातळी वाढल्याने किनारपट्टीजवळ राहणाऱ्या जगातल्या अब्जावधी लोकांना पुराच्या धोक्याचा सामना करावा लागणार आहे. मानव, प्राणी, वनस्पती, अर्थव्यवस्था आणि परिसंस्थेला याचा जबर धोका आहे. यामुळे ट्रिलियन डॉलर्सचं संभाव्य नुकसान आहे. हवामान बदलामुळे लोकांचे जीव धोक्यात येत आहेत आणि बरेच लोक गंभीर रोग, उष्णतेच्या लाटा, वायू प्रदूषण, अत्यंत तप्त हवामान आणि उपासमारीने मरत आहेत. ग्लोबल वॉर्मिंग १.५ डिग्री सेल्सिअसपर्यंत मर्यादित असलं तरीही मानवी जीवन आणि उपजीविकेची साधनं यांना धोका निर्माण होऊ शकतो. वाढती समुद्रपातळी, तीव्र वादळं आणि चक्रीवादळं यामुळे अनेक धोके निर्माण होत आहेत.

# महाराष्ट्रातील महाबंड

**घराणेशाहीवर आधारित पक्ष काही काळ निर्धोकपणे राज्य करू शकतात, पण त्यांनाही अनेकदा अपयशाचा सामना करावा लागतो. याचं कारण, मुख्य नेत्याचा करिश्मा संपला किंवा त्यांच्या वारसदारांची मर्यादित लोकप्रियताही घसरणीला लागली, तर पक्षाचे बारा वाजायला वेळ लागत नाही. म्हणून अगदी घराणेशाहीयुक्त पक्ष असला, तरी त्यातही किमान लोकशाही तरी हवी. नाहीतर आजच्या शिवसेनेसारखी दुरवस्था होऊ शकते.**



पक्षातली फूट, बंडखोरी हा भारतीय लोकशाही व्यवस्थेला लागलेला कॅन्सर आहे. काँग्रेस, जनता पक्ष, जनता दल यांसोबत देशातल्या प्रमुख पक्षांचा इतिहास बंडखोरीच्या शापानं भरलेला आहे. बंडखोरीनंतर मूळ पक्ष विकलांग किंवा नामशेष झाल्याची उदाहरणं आहेत. तसंच पडझडीतून पक्षाला नव्याने उभारणी देणारं नेतृत्वही पुढे आल्याचं दिसून येतं. खुद्द शिवसेनेलाही फूट नवी नाही. मात्र यावेळचा एकनाथ शिंदे यांनी पक्षाला दिलेला धक्का छगन भुजबळ, नारायण राणे, राज ठाकरे, गणेश नाईक यांच्यापेक्षा सर्वात मोठा आहे.

वसंतराव नाईक यांच्यानंतर सलगपणे पाच वर्षांची टर्म पूर्ण करणारा मुख्यमंत्री मीच राहिलो, असे उद्गार एकदा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी काढले होते आणि ते खरेच होते. शरद पवार यांनीही कधी सलग पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण केला नाही. १९८० नंतरच्या पाच वर्षांत राज्यात बॅरिस्टर अ. र. अंतुले, बाबासाहेब भोसले, शिवाजीराव निलंगेकर आणि वसंतदादा पाटील असे चार मुख्यमंत्री झाले. त्यामुळे महाराष्ट्राची दिशा हरवली. आता उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालचं महाविकास आघाडी सरकार अडीच वर्षांतच संकटात सापडल्यामुळे, राज्यात तशाच प्रकारचं राजकीय अस्थैर्य निर्माण झालंय.

### शिवसेनेतल्या बंडाची पार्श्वभूमी

शिवसेना आणि शिवसैनिक टिकवण्यासाठी अनैसर्गिक महाविकास आघाडीतून बाहेर पडणं अत्यावश्यक असून, महाराष्ट्र हितासाठी आता निर्णय घेणं गरजेचं आहे, असं आवाहन बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी केलं. उद्धवजींनी अप्रत्यक्षपणे दिलेला मुख्यमंत्रिपदाचा प्रस्ताव त्यांनी फेटाळून लावला.

काही महिन्यांपूर्वीच, हिंमत असेल, तर माझं सरकार घालवून दाखवा', असं आव्हान मुख्यमंत्र्यांनी दिलं होतं. पण आपली खुर्ची जाऊ शकते, याची पुसटशी शंकाही त्यांना आली नाही. सर्वशक्तिमान भाजपला मी आव्हान देतो आहे, ते तुम्हा मंडळींच्या भरवशावर!' असं मुंबई आणि औरंगाबादमधल्या प्रचंड जाहीर सभांमधे उद्धवजी म्हणाले, त्याला फार दिवस झालेले नाहीत.

याच महिन्यात पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी अयोध्या दौरा केला, तेव्हा त्यांच्या सोबत एकनाथ शिंदे, राज्यसभा खासदार संजय राऊत, विधान परिषद उपाध्यक्ष नीलम गोऱ्हे प्रभृती अनेकजण होते. मात्र तोपर्यंत पक्षात काय चाललंय, याचा उद्धव किंवा आदित्य यांना थांगपत्ताही लागला नव्हता. आश्चर्य म्हणजे गृहखातं, गुप्तचर विभाग यांच्यामार्फतही कोणतीही ठोस माहिती मिळाली नव्हती. फक्त भाजपचे काही मंत्री आणि नेते, उद्धवजींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्रजी यांच्यावर टीका करण्याऐवजी आपले आमदार संभाळून ठेवले तरी खूप झाले,' असं म्हणत होते.

### अस्वस्थतेचा स्फोट झाला

राष्ट्रवादीकडून शिवसेनेच्या आमदारांना चांगली वागणूक मिळत नाही, आमची कामं अडवली जातात, निधी दिला जात नाही, अशा तक्रारी असल्यामुळे सर्व आमदारांनी एकत्र येऊन बंड करायचं, असं दोन महिन्यांपूर्वीच ठरलं होतं. कोकणातल्या मुख्यमंत्र्यांच्या एका कार्यक्रमावर तिथल्या सेना आमदारांनी बहिष्कार टाकला होता. शिवाय असंतुष्ट आमदारांमधे मराठा आमदारांची संख्या अधिक आहे.

आपल्या नगरविकास खात्यात स्वपक्षाचे दोन मंत्री ढवळाढवळ करत असल्यामुळे शिंदे नाराज होते. ठाणे जिल्ह्यातल्या बदल्यांमधेही जेव्हा अधिकार चालला नाही, तेव्हा शिंदे यांनी संताप व्यक्त केला. तेव्हा कुठे त्यांचं म्हणणं मान्य झालं. आदित्य ठाकरे आणि त्यांचे मावसबंधू वरुण सरदेसाई यांचं वाढतं महत्त्व यामुळे आणि राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकांमधे विश्वासात न घेण्यात आल्यामुळे शिंदे यांची अस्वस्थता वाढत चालली होती.

या अस्वस्थतेचा आता स्फोट झाला असला, तरी बाळासाहेबांच्या हिंदुत्वापासून पक्ष दूर गेल्यामुळे आपण बंड पुकारलं असल्याचं शिंदे गटाने स्पष्ट केलंय. काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबर जाणं म्हणजे हिंदुत्वाचा विसर पडणं, असं जर त्यांना वाटत होतं, तर शिंदे महाविकास आघाडी सरकारात सामीलच का झाले? हा प्रश्नच आहे.

### आणि सरकार स्थापन झालं

२०१९च्या विधानसभा निवडणूक प्रचारात आणि त्याही आधीपासून नव्या युती सरकारमधे सगळं कसं समसमान हवं, अशी भूमिका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सातत्याने मांडत होते. मुख्यमंत्रिपदी शिवसैनिकालाच बसवणार, असा निर्धार व्यक्त करत होते आणि तसा शब्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना आपण दिल्याचं सांगत होते.

२४ ऑक्टोबर २०१९ला महाराष्ट्र विधानसभेचे निकाल लागले आणि शिवसेनेला वगळून भाजप सरकार स्थापन करू शकत नाही, हे स्पष्ट झालं. ही संधी साधत उद्धवजींनी मुख्यमंत्रिपदासाठी शिवसेना आग्रही राहणार आणि त्यासाठी सर्व पर्यायांचा वापर करणार, असे संकेत दिले होते. उलट भाऊबीजेच्या दिवशी पत्रकारांना दिलेल्या फराळाच्या कार्यक्रमात, मुख्यमंत्रिपद शिवसेनेला अडीच वर्ष देण्याचा निर्णय झालाच नव्हता, असे उद्गार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

आपण खोटं बोलत असल्याचा फडणवीस यांच्या बोलण्याचा अन्वयार्थ असल्यामुळे उद्धवजी संतापले. ताबडतोब युतीची बैठक त्यांनी रद्द केली आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादीबरोबर सरकार स्थापन केलं. कोणताही अनुभव नसताना अडीच वर्ष हे सरकार चालवून अखेर आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे.

### चौकशीच्या फेऱ्यात नेते

एकेकाळी बाळासाहेबांनीही या चिमण्यांनो परत फिरा', असं आवाहन केलं होतं. शिवसेना हा पक्ष आदेशावर चालतो, असं खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा ठासून सांगितलं असलं, तरी उद्धवजींचे आदेश पाळले जात नसल्याचं राज्यसभा आणि खास करून विधान परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकांतून दिसून आलं. या परिस्थितीत थेट शिवसैनिकांना भावनिक साद घालून आपलं नेतृत्व अबाधित ठेवणं, हेच उद्धवजींना करावं लागतंय.

**आज-काल**
**हेमंत देसाई**

विशेष म्हणजे ईडी, सीबीआय आणि आयकर विभाग या केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकलेले शिवसेना आमदार प्रताप सरनाईक, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी कलंकित' अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या पत्नी आमदार यामिनी जाधव तसंच ईडी'ग्रस्त खासदार भावना गवळी यांचाही एकनाथ शिंदेप्रणीत बंडखोर गटात समावेश आहे. त्यामुळे माजी खासदार किरीट सोमय्या यांचीच आता पंचाईत होणार आहे.

परिवहनमंत्री अनिल परब यांची सलग दुसऱ्या दिवशी ईडी'ने ११ तास चौकशी करून आपला दबाव कायम राहील, असे संकेत दिले आहेत. पण मातोश्री'चं राजकारण दरबारी स्वरूपाचं आहे, अशी टीका पूर्वीपासून होत आलीय.

### संपर्कावरून कुरबुरी वाढल्या

माझ्या विठ्ठलाच्या, म्हणजेच बाळासाहेबांभोवती बडव्यांचा वेढा पडला आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली होती. आज एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई यांचं वाढलेलं महत्त्व आणि आपल्यासारख्यांची होत असलेली उपेक्षा, याबद्दल असंतोष व्यक्त केला आहे.

शिवसेनेसारख्या पक्षात घराणेशाही असल्यामुळे, लोकशाही परंपरा तेवढ्या विकसित झालेल्या नाहीत. जिल्हाप्रमुख, उपनेते, नेते अशी पदं असली तरी पक्ष कार्यकारिणी, संसदीय मंडळ, विविध विषयांवरच्या समित्या यांच्यामार्फत निर्णय घेण्याची प्रक्रियाही तयार झालेली नाही. वेगवेगळ्या बैठकांच्या आणि कामांच्या निमित्ताने सतत संपर्क येत असतो आणि माहितीची देवाणघेवाण होत असते.

बाळासाहेबांचा सर्वसामान्य शिवसैनिकाशी थेट संबंध होता. तशा प्रकारचे संबंध उद्धवजींचे नाहीत आणि आमदारांशीही त्यांनी नीट संपर्क ठेवला नाही, अशी सार्वत्रिक टीका होत आहे.

### राजकारणातली घराणेशाही

घराणेशाहीवर आधारित असलेले पक्ष काही काळ निर्धोकपणे राज्य करू शकतात. पण त्यांनाही अनेकदा अपयशाचा सामना करावा लागतो. याचं कारण, मुख्य नेत्याचा करिश्मा संपला किंवा त्यांच्या वारसदारांची मर्यादित लोकप्रियताही घसरणीला लागली, तर पक्षाचे बारा वाजायला वेळ लागत नाही. आज काँग्रेसमधे राहुल गांधी यांचे बहुतेक सर्व निकटवर्तीयच पक्ष सोडून भाजपात दाखल झाले आहेत. राहुल यांच्या मागे ना जनता आहे, ना नेते.

बिहारमधे लालूप्रसाद यादव यांच्या तुरुंगवासानंतर राष्ट्रीय जनता दलाला सत्तावंचित व्हावं लागलं. तेजस्वी आणि तेजप्रताप या त्यांच्या दोन पुत्रांमधे संघर्ष झाला. अखेर तेजस्वीने आपलं कर्तृत्व दाखवून दिलं असलं, तरी त्या पक्षातही हुकूमशाही स्वरूपाचंच वर्तन असल्यामुळे यशाला मर्यादा येत आहे. तामिळनाडूत करुणानिधी हयात असतानाच त्यांचे चिरंजीव स्टालिन आणि दुसरे पुत्र अळगिरी यांच्यात मतभेद उत्पन्न झाले. शेवटी स्टालिन मुख्यमंत्री झाले. तर द्रमुकमधल्या इतर अनेक कर्तृत्ववान नेत्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी लाभली नाही.

आंध्रचे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांच्या पत्नी लक्ष्मी पार्वती यांनी राजकारणात प्रवेश केला; पण त्यांना मतदारांनी धूळ चारून नाकारलं. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन यांच्या पत्नी जानकी रामचंद्रन यांनाही राजकारणात अपयशच आलं. कर्नाटकात झालेल्या गेल्या विधानसभा निवडणुकीत देवेगौडा कुटुंबाच्या घराणेशाहीविरुद्ध जनतेचा रोष व्यक्त झाला. अर्थात नवीन पटनाईक यांच्यासारख्या कार्यक्षम आणि कर्तृत्ववान नेत्याला सातत्याने यश मिळत गेलं. यासारखे काही अपवाद आहेत.

लोकशाही प्रक्रिया असलेल्या पक्षातही चर्चा-संवादाची पद्धत खंडित झाल्याचं पाहायला मिळतं. पण त्या व्यवस्थेत हा दोष दूर करण्याची अंगभूत यंत्रणा तरी असते. याउलट, कुटुंबप्रधान पक्षात मुख्य नेता आणि कार्यकर्ते आणि इतर नेते यांच्यात अंतर निर्माण होतं आणि करिश्मा नसला किंवा तो संपला, तर अख्खा पक्षच विकलांग व्हायला वेळ लागत नाही. म्हणून अगदी घराणेशाहीयुक्त पक्ष असला तरी त्यातही किमान लोकशाही तरी हवी. नाहीतर आजच्या शिवसेनेसारखी दुरवस्था होऊ शकते.

### अशी होती शिवसेनेतली बंडं

आता बाळासाहेबांची शिवसेना उरली नाही, या प्रचाराला उत्तर देताना उद्धवजींनी, आपल्या पित्याच्या निधनानंतर, २०१४ला सेनेने आपल्या नेतृत्वाखाली स्वबळावर निवडणूक लढवून ६३ आमदार विजयी केले, याचा रास्तपणे उल्लेख केला आहे. एरवी मुख्यमंत्र्यांकडे असलेले नगरविकास खातं उद्धवजींनी शिंदे यांच्याकडे सोपवलं होतं.

सुरवातीच्या काळात शिवसेनेतली बंडं कठोरपणे मोडून काढली जात असत. सेनेची कार्यपद्धती लोकशाही मार्गाने असावी, अशी मागणी करणाऱ्या शिवसेना नेते बळवंत मंत्री यांचे कपडे फाडून त्यांची धिंड काढण्यात आली होती. मार्च १९८९ला ठाण्याच्या महापौर निवडणुकीत सेनेचा पराभव झाला, तेव्हा गद्दार ठरवण्यात आलेले नगरसेवक श्रीधर खोपकर यांची हत्या झाली होती. या प्रकरणात आनंद दिघे यांच्यासह ५२ शिवसैनिकांना अटक झाली होती.

शिवसेना नेते म्हणून छगन भुजबळ यांनी उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ असे दौरे सुरू करून पक्षाचा जनाधार वाढवला. पण एवढी मेहनत घेऊनही, बाळासाहेबांनी मनोहर जोशी यांना विधानसभेतलं विरोधी पक्षनेतेपद दिलं. त्यामुळे खवळलेल्या भुजबळांनी १९९१ला नागपुरात विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र' केला. भुजबळ यांच्या घरावरही हल्ला झाला होता.

### आरोपांच्या भोवऱ्यात मुख्यमंत्री

उद्धवजींनी शिवसेनेला दहशतवादमुक्त केलं असून, उलट चुकीला माफी आहे', असं फेसबुक लाईव करून सांगितलं. आता उद्धवजींमागे मोजकेच आमदार राहिलेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर हातमिळवणी करून उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री झाले. पण गेल्या अडीच वर्षांच्या काळात त्यांच्याविषयीच्या तक्रारी वाढत गेल्या.

शिवसेनेच्या आमदारांना ते भेटत नाहीत. मुख्यमंत्री नामधारी असून प्रत्यक्ष कारभार राष्ट्रवादीचे नेतेच हाताळत आहेत. सत्तासूत्रं किचन कॅबिनेटच्या हातीच आहेत. मुख्यमंत्री मंत्रालयात जात नाहीत, असे अनेक आरोप केले जात होते. त्यात अगदीच तथ्य नव्हतं असं नाही. शिवसेनेच्या आमदारांमधल्या असंतोषाची कल्पना त्यांना कदाचित असलेही. पण तो इतक्या टोकाला जाऊन त्याचं बंडखोरीत होईल, याची कल्पना कदाचित त्यांनी केली नसेल.

# राष्ट्रपती उमेदवारीचे 'मिशन पॉलिटिक्स'

**राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएकडून राष्ट्रपतीपदासाठी भाजपच्या द्रौपदी मुर्मू यांचा अर्ज दाखल करण्यात आलाय. मुर्मू देशातल्या आणि झारखंडच्या पहिल्या आदिवासी महिला राज्यपाल ठरल्या होत्या. त्यांच्या नावाची घोषणा करून भाजपनं महिला आणि आदिवासी असं दुहेरी कार्ड खेळलंय. त्यामागच्या मिशन पॉलिटिक्सची जोरदार चर्चा आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणात बंडाची ठिणगी पेटली असताना २१ जूनला दिल्लीत राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीबद्दलच्या घडामोडींना वेग आला होता. विरोधी पक्षाने यशवंत सिन्हा यांची राष्ट्रपतीपदाचा उमेदवार म्हणून घोषणा केली. तर त्याच दिवशी रात्री ९ वाजता भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी एनडीएच्या उमेदवार म्हणून झारखंडच्या माजी राज्यपाल द्रौपदी मुर्मू यांचं नाव घोषित केलं.

भाजपकडून मुर्मू यांचं नाव येण्याची शक्यता आधीपासूनच वर्तवली जात होती. याआधी भाजपनं पीए संगमा यांच्या रूपाने एक आदिवासी चेहरा राष्ट्रपतीपदाच्या शर्यतीत उतरवला होता. आता एक आदिवासी महिला उमेदवार देऊन भाजपनं एक नवं 'मिशन पॉलिटिक्स'चा डाव टाकलाय. द्रौपदी मुर्मू यांच्या रूपाने टाकलेला हा डाव यशस्वी होतोय का ते येणारा काळ ठरवेल.

### मुलांचं अकाली जाणं

द्रौपदी मुर्मू यांचा जन्म २० जून १९५८ला ओडिशातल्या मयूरभंज जिल्ह्यातल्या बैदापोसी गावात झाला. त्या संथाल नावाच्या आदिवासी समूहातून येतात. त्यांचे आजोबा आणि वडील बिरांची नारायण तुडू हे दोघंही गावचे प्रमुख होते.

रामादेवी वुमन कॉलेजमधून त्यांनी बीएची पदवी घेतली. त्यांचं श्याम चरण मुर्मू यांच्यासोबत लग्न झालं. दोन मुलगे आणि एक मुलगी अशी तीन मुलंही झाली. पण हे समाधान फार काळ टिकलं नाही. त्यांच्या दोन मुलांचा अकाली मृत्यू झाला.

मुर्मू यांनी आपल्या पतीलाही गमावलं होतं. शिक्षक म्हणून त्यांच्या व्यावसायिक करियरला सुरवात झाली. त्यांनी ३ वर्ष मुलांना शिकवलं. हळूहळू त्यांची पावलं राजकारणाकडे वळू लागली. त्याआधी त्यांनी काही काळ ओडिशातल्या जलसिंचन आणि वीज खात्यात ज्युनिअर असिस्टंट म्हणून नोकरी केली होती.

**विशेष**
**अक्षय शारदा शरद**

### नगरसेवक ते राष्ट्रीय राजकारण

१९९७ला रायरंगपूर नगर पंचायतीच्या नगरसेवकपदाची निवडणूक त्यांनी जिंकली. ही निवडणूक त्यांच्या राजकारणातल्या एण्ट्रीची सुरवात ठरली. त्याच वर्षी रायरंगपूर जिल्ह्याचं उपाध्यक्षपद त्यांच्याकडे आलं. २०००ला रायरंगपूर विधानसभा मतदारसंघातून त्यांना तिकीट मिळालं. ओडिशा विधानसभेत त्यांचा प्रवेश झाला.

२००० ते २००४मधे ओडिशात नवीन पटनाईक यांचा बिजू जनता दल आणि भाजप यांची युती होती. त्या सरकारमधे मुर्मू यांना पहिल्याच फटक्यात वाणिज्य, वाहतूक आणि मत्स्य, पशुसंवर्धन खात्याची जबाबदारी मिळाली. २००९ला त्यांना पुन्हा विधानसभेचं तिकीट मिळालं. २००७ला ओडिशा विधानसभेच्या सर्वश्रेष्ठ नीलकंठ पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

२००२ ते २००९ आणि पुढे २०१३ला मुर्मू यांच्याकडे मयूरभंज जिल्हा भाजपचं अध्यक्षपद देण्यात आलं. याच वेळी त्यांची राष्ट्रीय राजकारणात एण्ट्री झाली. त्यांना भाजपच्या अनुसूचित जमाती मोर्चाचं उपाध्यक्ष बनवण्यात आलं. तसंच पक्षाच्या आदिवासी मोर्चाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचं सदस्य म्हणून काम करायची संधीही त्यांना मिळाली.

### पहिल्या आदिवासी महिला राज्यपाल

२०१५ला केंद्रातल्या मोदी सरकारने झारखंडच्या राज्यपाल म्हणून त्यांची नेमणूक केली. त्यांना राज्यातल्या पहिल्या महिला राज्यपाल बनण्याचा बहुमान मिळाला होता. केवळ महिला राज्यपालच नाही तर त्या भारतातल्या पहिल्या महिला आदिवासी राज्यपाल ठरल्या होत्या. त्यावेळी झारखंडमधे भाजपच्या रघुवर दास यांचं सरकार सत्तेत होतं.

२०१७ला आदिवासी आपली जमीन कुणालाही विकू शकतात या संदर्भातल्या दोन कायद्यांमधे बदल करण्याचा निर्णय रघुवर दास सरकारने घेतला. या कायद्याला राज्यभरातून प्रचंड विरोध झाला. त्यातून जागोजागी हिंसाचार झाला. संविधानाच्या पाचव्या अनुसूचीमधे आदिवासींची विशेष ओळख कायम रहावी म्हणून काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. याचं हे थेट उल्लंघन असल्याचं आंदोलनकर्त्यांचं म्हणणं होतं.

यावर राज्यपाल म्हणून द्रौपदी मुर्मू शांत राहिल्यामुळे त्यांच्यावर टीका झाली. त्यांना आदिवासींचं म्हणणं जाणून घ्यावं लागलं. सरकारने काढलेला अध्यादेश आदिवासींच्या विरोधामुळे वापस घ्यावा लागला. पुढच्या निवडणुकीत हेमंत सोरेन यांच्या झारखंड मुक्ती मोर्चाचं सरकार सत्तेत आलं. त्यांच्यासोबत मुर्मू यांचे संबंध अतिशय चांगले राहिले.

# राष्ट्रवादीच्या जिल्हा सरचिटणीसवर आत्महत्येची वेळ?

## कुठे आहे पक्ष नेतृत्व; रमेश सोळंके यांना सावकारीचा अजगरी विळखा

▶ प्रतिनिधी



बीड : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस रमेश सोळंके सावकाराच्या जाचाला कंटाळून त्रस्त झाले आहेत. सोळंके यांच्यावर सावकाराच्या अजगरी विळख्यामुळे चक्क आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यावर अशी वेळ येत असेल तर सामान्य कार्यकर्त्यांचे काय? असा सवाल जनतेमधून उमटत आहे. दरम्यान, माझ्यावर एवढा मोठा अन्याय झाला असताना कुठे आहे? पक्ष नेतृत्व असा उद्विग्न सवाल सोळंके यांनी व्यक्त केला.

वैयक्तिक कामासाठी रमेश सोळंके यांनी अवैध सावकारी करणाऱ्या दोघांकडून व्याजाने पैसे घेतले होते. दरम्यान, सावकाराच्या चक्री व्याजात गुरफटून व्याजाची रक्कम तसेच १० एकर जमीन असे जवळपास १ कोटी रूपये फेडले. एवढे पैसे देऊनही कथित सावकार पैशासाठी छळ करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांनी केला आहे. सामाजिक पत सांभाळण्यासाठी सावकरांचा छळ सहन केला. दरम्यान सावकारांच्या विरोधात सहायक निबंधक यांच्याकडे तक्रार दाखल केली. सहायक निबंधकांनी थातूरमातूर कार्यवाही पलीकडे काहीही केले नसल्याचा आरोप सोळंके यांनी केला आहे. छोट्या व्यवसायापासून करोडोच्या संपत्तीचा मालक झालेला सावकार सर्वसामान्यांची लूट करत आहे. त्याचा प्रताप प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊन देखील सहायक निबंधक आणि त्यांचे कार्यालयीन कर्मचारी काहीच कारवाई करत नसल्याचे रमेश सोळंके यांनी म्हटले आहे. पत्रकार परिषद घेऊन रमेश सोळंके यांनी सहायक निबंधक यांच्यावर अनेक गंभीर आरोपदेखील केले. न्याय न मिळाल्यास मुलाबाळांसह आत्महत्या करणार असल्याचा इशारा देखिल त्यांनी यावेळी दिला. एकेकाळी सामाजिक कार्यासाठी स्वत:ला झोकून देत स्वखर्चाने अनेकांच्या अडीअडचणी सोडविणाऱ्या बड्या पक्षाच्या माजी तालुकाध्यक्षांवर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ आल्याने माजलगाव तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, माजलगाव तालुक्यात अवैध सावकारी मोठ्या प्रमाणावर सुरू असून खाजगी सावकार दहा, वीस टक्क्यांनी सामान्य व गरजू लोकांना अक्षरश: लुटतात, अशा सावकारांच्या लुटीच्या तालुक्यातुन आलेल्या जवळपास आठ तक्रारी सहायक निबंधक यांच्याकडे चौकशीविना पडून आहेत.

### अन्यायाची कैफियत जयंत पाटील, अजित पवारांकडे मांडणार

सादोळा ग्रामपंचायतीपासून आपल्या राजकीय जीवनात प्रारंभ झाला. पुढे तालुक्याच्या राजकारणात सक्रिय होवून राष्ट्रवादी काँग्रेसचे जोमाने काम केले. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. पक्षानेही वेळोवेळी सन्मान केलेला आहे. माजलगाव तालुकाध्यक्ष त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा बीड जिल्हा सरचिटणीस अशी सन्मानजनक पदे दिली. एकीकडे पक्षात सन्मान होत असला तरी दुसरीकडे सावकाराकडून घोर अन्याय होत आहे. या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम पक्षश्रेष्ठींनी करावे अशी आपली मागणी आहे, असे रमेश सोळंके म्हणाले. दरम्यान, आपली संपूर्ण कैफियत लवकरच राष्ट्रवादीचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडे मांडणार असून त्यांची मुंबईत भेट घेणार आहे, अशी माहितीही सोळंके यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

### राष्ट्रवादीला आर.आर.पाटलांच्या शिकवणीचा विसर



राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालिन गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी गुन्हेगारी आणि सावकारीला मोठ्या प्रमाणात आळा घालण्यासाठी सावकारी विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली होती. अनेकांना सावकारी विळख्यातून बाहेर काढले होते. आजमितीला रमेश सोळंकेंसारख्या राष्ट्रवादीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांवर सावकारी जाचाला कंटाळून जर आत्महत्येची वेळ येत असेल तर यासारखी दुसरी शोकांतिका नसेल. आर.आर.पाटील ऊर्फ अबांनी दिलेली शिकवण पक्ष विसरला आहे काय? असा सवाल विचारला जात आहे.

# वृक्षारोपणाची चळवळ अधिक गतिमान व्हावी

**पत्रकार देशमाने यांचे आवाहन**



▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : निसर्गसंपदा टिकली तरच मानव टिकेल ही साधी आणि सरळ व्याख्या अंमलात आणण्याची गरज आहे. त्यामुळे वृक्षारोपणाची चळवळ अधिक गतिमान होण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने यांनी केले.

दिंद्रुड येथील प्रतिष्ठित व्यंकटेश पब्लिक स्कुलच्या प्रांगणात संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बंडु जी. खांडेकर, पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका स्वाती ठोंबरे, मुख्याध्यापक प्रदीप देशमाने, नितीन ठोंबरे, भीमराव मस्के, सबीर कराडो, कृष्णा चौरे, गीता ठोंबरे , राणी सटाले, मनीषा रायकर, विद्या सोळंके, माया सोळंके, अयोध्या लाटे, वैष्णवी सोळंके, योगेश ठोंबरे आदींची उपस्थिती होती. वृक्षारोपणाची चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. याप्रसंगी संस्थेच्या कार्याची माहिती बंडु खांडेकर यांनी दिली. प्रास्ताविक नितीन ठोंबरे यांनी केले.

### दर्जेदार शिक्षणासाठीच 'व्यंकटेश'ची निर्मिती...

राजमाता जिजाऊ सेवाभावी संस्थेच्यावतीने दिंद्रुड परिसरातील मुला–मुलींना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे, या हेतुने व्यंकटेश पब्लिक स्कुलची निर्मिती करण्यात आली आहे. सर्व सोयींनीयुक्त, निसर्गसंपदेने नटलेल्या प्रशस्त परिसरात व्यंकटेश स्कुल विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहे. त्याला सुज्ञ पालक व पाल्यांकडूनही मोठा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप ठोंबरे यांनी दिली.

# माणसातील विठ्ठलाचे डोळा भरून दर्शन

## डॉ.भारत चव्हाण यांची शरद पवार यांच्याबद्दल भावना

▶ प्रतिनिधी

औरंगाबाद : राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार शरद पवार यांच्या समवेत ऐन आषाढीच्या दिवशी केलेले हवाई भ्रमण अविस्मरणीय होते. साक्षात माझ्यासाठी दुसरे विठ्ठलाचे दर्शन होते, अशा शब्दांत डॉ.भारत चव्हाण यांनी भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार १० जुलैपासून मराठवाड्यातील विविध कार्यक्रमानिमित्त औरंगाबादमध्ये आले होते. औरंगाबादहून शरद पवार यांना त्याच दिवशी भेटण्यासाठी डॉ.भारत चव्हाण आले होते. भारत चव्हाण यांनी वनस्पतीशास्त्रात संशोधन केले आहे. पीएचडी प्रबंध शरद पवार यांना दाखवण्यासाठी ते आले होते. पवार यांनी भेटीनंतर औरंगाबादलाच जाणार



असल्याने सोबत येणार का असे विचारले? भारत चव्हाण यांनी त्यांना विमानाने प्रवास करण्याची तयारी दर्शवली. भारत चव्हाण यांनी शरद पवार यांच्यासोबतच्या विमान प्रवासाचे फोटो ट्विट केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी भारत चव्हाण यांना विमानाने औरंगाबादला सोबत येण्यास सांगितले. विमान प्रवासादरम्यान पवार यांनी भारत चव्हाण यांच्या कुटुंबाची, गावाची विचारपूस केली. डॉ.भारत चव्हाण यांनी उसाच्या बगॅसवर अळिंबीची (मशरूम) लागवड या विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनाबद्दल त्यांनी शरद पवार यांच्याशी चर्चा केली.

# स्वानंदी परिवाराच्या 'अभंगवाणी'ला प्रतिसाद

▶ प्रतिनिधी

माजलगाव : विश्वनियंता विठ्ठलाच्या चैतन्याने अणू रेणू सजीव झाल्याचा अमृतानुभव एकादशीस सर्वांनी घेतला. त्यातीलच एक माजलगाव येथील स्वानंदी परिवाराच्या सूरजन समुहाचा प्रयत्न

दि.१० जुलै रोजी आषाढी एकादशीच्या निमित्ताने सुरजन समूहाच्या वतीने 'अभंगवाणी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

लहानशा विद्यार्थ्यांची साथ संगत, अभंग पुस्तिका, उत्तम निवेदन, शंभरच्या वर श्रोतावर्ग, पांडुरंग– रखुमाईची रांगोळी, २० ते २२ जणांचे सादरीकरण, सफेद वेश, ३.३० तासांची बैठक देणारा श्रोता हे या कार्यक्रमाचे वेगळेपण होते. या कार्यक्रमात एकूण २२ अभंग सादर झाले. यात मोगरा फुलला, कानडा राजा पंढरीचा, अबीर गुलाल,अशा अनेक अभंगांचे सादरीकरण झाले. यावेळी सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांनी साजेशी अशी तबला साथ केली व एकूणच पखवाज साथ ड.राम देशपांडे यांनी केली. तर संवादिनी साथ संजय कुलकर्णी, प्राणेश पोरे व कुणाल कुलकर्णी यांनी केली. या 'अभंगवाणी' ची सुरुवात ॲड.राम देशपांडे आणि प्रशांत भानप यांनी श्री विठ्ठलाच्या पूजनाने केली. यानंतर सर्व अभंगांच्या प्रतीचे विमोचन जगदीश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे निवेदन अन्वी जाधव हिने अतिशय सुरेल केले. या कार्यक्रमासाठी रसिक श्रोत्यांची उपस्थिती १०५ होती. यावेळी स्मिता लिंबगावकर, सौ.निळेकर, पूजा देशमुख, अनघा देशमुख, सौ.ठोंगे, अंकुश साबळे, राजाभाऊ शेळके, डॉ.अतुल निळेकर, किशोर कुलकर्णी, सुरेश भानप, विकास जाधव आदी रसिक श्रोते उपस्थित होते.















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे मंगेश चिवटे नवे प्रमुख

## सीएम कार्यालयात ओएसडी पदावर नियुक्ती

▶ प्रतिनिधी

मुंबई : पत्रकारिता आणि आरोग्य क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय कार्य करणारे मंगेश चिवटे यांची मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून मंगेश चिवटे यांची निवड करण्यात आली आहे.

मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष पुन्हा गजबजणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करमाळ्याचे मंगेश चिवटे यांची मुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून गुरूवारी (२१ जुलै) नेमणूक केली आहे. सोमवारी (२५ जुलै) चिवटे कक्ष प्रमुखाचा कार्यभार स्वीकारणार आहेत. उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात हा कक्ष कार्यरत होता, मात्र अनेक जाचक अटींमुळे त्याचा लाभ मोठ्या संख्येने गरजूंना होऊ शकला नव्हता.



देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर १३ मार्च २०१५ रोजी या कक्षाची स्थापना झाली होती. सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) रकमेतून या कक्षातून मदत केली जात होते. द्रारिद्र्य रेषेखालच्या राज्यातील रूग्णांना या कक्षातून खर्चाच्या ६० टक्क्यांपर्यंत मदत केली जात होती. ओमप्रकाश शेटे हे कक्षाचे प्रमुख होते. पहिल्या तीन वर्षात या कक्षाने २८ हजार गरजू रूग्णांना ३०२ कोटींची मदत केली. तसेच ४५० धर्मादाय रूग्णालयांच्या १० टक्के राखीव खाटांमधून ६०० कोटींचे उपचार झाले होते. या कक्षावर भ्रष्टाचाराचे आरोपही झाले होते. त्यामुळे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी कक्षात केवळ सरकारी अधिकारी नेमले. तसेच निवडक १० गंभीर आजारांसाठी मदत देण्याच्या अटी टाकल्या. परिणामी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष असूनही निरूपयोगी होता. तसेच येणाऱ्या अर्जांची संख्या घटली होती.



### महाराष्ट्राचा आरोग्यदूत कक्षप्रमुख

आरोग्य क्षेत्रात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून भरिव कार्य केलेले महाराष्ट्र तथा महाराष्ट्राचे आरोग्यदूत म्हणून सर्वदूर परिचित असलेले मंगेश चिवटे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या प्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर बांदा ते चंद्रपूरपर्यंत त्यांच्या नियुक्तीचे स्वागत झाले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची स्थापना झाली. या कक्षाची मूळ संकल्पना मंगेश चिवटे यांची आहे. त्याअनुषंगाने मंगेश चिवटे यांची नियुक्ती झाल्याने योग्यवेळी योग्य व्यक्तीचा यथोचित सन्मान झाला असल्याची प्रतिक्रिया संपूर्ण राज्याभरातून उमटत आहे. मंगेश चिवटे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे विश्वासू आहेत.



## मल्टीस्टेटच्या राष्ट्रीय अधिवेशनाची जय्यत तयारी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मल्टीस्टेट संस्थेच्या अडचणी सोडविण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होणाऱ्या अधिवेशनास मल्टीस्टेट सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा साई देवस्थान शिर्डी संस्थानचे विश्वस्त सुरेश वाबळे यांनी केले. दरम्यान, या अधिवेशनाची जय्यत तयारी झाली असल्याची माहिती 'वर्तमान'शी बोलताना वाबळे यांनी दिली.

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट, श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थांना गुरूवारी सदिच्छा भेट दिली असता त्यांनी सर्व मल्टिस्टेट अध्यक्षांशी संवाद साधला. सहकार चळवळीस योग्य दिशा मिळावी व मल्टीस्टेट संस्थांना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात करिता चर्चा करण्यात आल्या व सदरील येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच जास्तित जास्त मल्टीस्टेट संस्थांनी अधिवेशनात सहभाग नोंदवावा असे आवाहन देखिल त्यांच्या कडून करण्यात आले आहे. मल्टीस्टेटच्या कामकाजामध्ये सुधारणा व्हावी व त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे यासाठी फेडरेशन कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, श्री मंगलनाथ मल्टिस्टेटचे कार्यकारी संचालक व मल्टिस्टेट फेडरेशनचे संचालक रविंद्र कानडे, आधार मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुनिल सौंदरमल, महानंदा मल्टीस्टेटचे अध्यक्ष ओंकार खुर्पे, सिध्दराज मल्टीस्टेटचे अध्यक्ष अशोकराव सोळंके, कबीर मल्टीस्टेटचे रवि टाकणखार आदी उपस्थित होते.

